I.O करीता.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** शेवगांव

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0832 **Year (वर्ष):** 2022

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/11/2022 23:06

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 14/11/2022
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 14/11/2022
   **Time From (वेळेपासून):** 12:07 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:23 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 14/11/2022 **Time (वेळ):** 20:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 044

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/11/2022 22:55 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शेवगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सचिन बापुसाहेब रिंगे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अमरापुर,शेवगांव,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अमरापुर,शेवगांव,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रदिप षंकर महाषिकारे | | | 1. आखेगाव रोड, शेवगाव, जिअहमदनगर,शेवगांव, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 8000 | 8,000.00 |

गोपनीय



10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

8,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी सचिन बापुसाहेब रिंगे वय.31 वर्षे धंदा-खाजगी नोकरी/शेती रा. अमरापुर ता.षेवगाव जि.अहमदनगर. समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी दि.13/11/2022 रोजी पोलीस उपअधीक्षक श्री. खेडकर, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर यांचेषी संपर्क करून एका लोकसेवकाविरूध्द लाचमागणीची तक्रार सांगितली होती. पो.उपअधी.श्री. खेडकर यांनी मला दि.14/11/2022 रोजी लाचेच्या रकमेसह व दुचाकी मोटार सायकलसह षेवगाव येथील सुरक्षित ठिकाणी हजर राहणेबाबत कळविले होते. व मला पोलीस निरीक्षक शरद गोर्डे यांचा मोाबाईल नंबर देवुन ते तुमच्याशी संपर्क करतील असे कळविले होते. त्याप्रमाणे मी व माझे दाजी श्री.जयदिप भास्करराव खराद असे आज दि. 14/11/2022 रोजी षेवगाव येथील सुरक्षित ठिकाणी 11/00 वा. हजर झालो. थोडया वेळाने पोलीस निरीक्षक शरद गोर्डे व पोलीस निरीक्षक श्री. गहिनिनाथ गमे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर हे षासकिय वाहनाने सापळा पथकासह तेथे आले. पोनि श्री. गमे यांनी मला ओळख विचारून मला सदर वाहनात बसण्यास सांगितले. पोनि श्री.गमे यांनी सदर वाहनात हजर असलेले दोन पंच, सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी यांचेषी माझी ओळख करून दिली. उपस्थित दोन्ही पंचांनी मला माझे नाव, पत्ता व तक्रार विचारली असता मी त्यांना माझे नाव, पत्ता वरील प्रमाणे सांगुन तक्रार सांगितली की, ''माझे आजोबा दत्तात्रय आसाराम रिंगे यांचे नावे आमरापुर षिवारातील षेत गट नंबर 180 मधे 21 गुंठे क्षेत्र जमिनिची भूमि अभिलेख कार्यालय, षेवगाव यांचेकडुन मोजणी करून घेतली होती. त्यासाठी मी दि.22/07/2022 रोजी 3,000/- रूपये शासकिय फी भरली होती. मोजणी नुसार खातेदार यांचे पोट हिस्से करून हद्दीच्या खुणा दर्षविण्यात आल्या होत्या. त्याचा सुधारित नकाषा देण्याकरिता लोकसेवक श्री. महाषिकारे, भूकरमापक हे 10,000/-रुपये लाचेची मागणी केली असल्याबाबत तक्रार सांगितली. तसेच यापुर्वी श्री.महाषिकारे यांनी मला त्यांचे ओळखीच्या इसमास पैसे दयायचे आहे असे सांगुन त्यांनी माझेकडे 13,000/-रुपये दिले व त्यात माझे 5,000/-रुपये टाकुन एकुण 18,000/-रुपये रक्कम त्यांचे स्टेट बँक आॅफ इंडिया, षाखा पाथर्डी येथील खाते क्र. 33345362103 वर आरटीजीएस करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी त्यांचेकडील 13,000/-रुपये व त्यांनी मला सांगितलेली रक्कम रूपये 5000/-रु असे मिळुन 18,000/-रुपये दि.17/10/2022 रोजी माझे सर्वज्ञ मल्टिस्टेट पतसंस्था, अमरापुर या पतसंस्थेचे खाते क्र. 064000003424 वरून महाषिकारे यांचे वरील खाते क्रमांकावर आरटीजीएस केले होते. त्यानंतर महाषिकारे यांनी मला दि. 18/10/2022 रोजी पुन्हा 5,000/-रुपये आरटीजीएस करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी पुन्हा माझे वर नमुद खाते क्रमांकावरून महाषिकारे यांचे खात्यावर 5000/-रु. आरटीजीएस केले. अषा प्रकारे महाषिकारे यांनी माझ्याकडुन यापुर्वी 10,000/-रुपये त्यांचे खात्यावर आरटीजीएस प्रणालीव्दारे स्विकारले आहेत. अषी तक्रार सांगितली. पोनि श्री.गमे यांनी माझी तक्रार माझे हस्ताक्षरात लिहून घेतली. त्यावर मी, पोनि श्री.गमे व पंचानी सहया केल्या. त्यानंतर माझे तक्रारी प्रमाणे लोकसेवक महाषिकारे हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे ?लाचेची रक्कम कधी व कुठे दयावयाची? याबाबत लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले.

त्यानंतर पोनि श्री.गमे यांनी मला, माझे दाजी खराद यांना व दोन्ही पंचांना पडताळणी कारवाईमध्ये व्हाईस रेकाॅर्डरचे वापराबाबत माहिती दिली. पोनि श्री. गमे यांचे सुचनेवरून पोकाॅ पांढरे यांनी व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये नविन मेमरीकार्ड टाकून त्यामध्ये कोणतीही फाईल ध्वनीमुद्रीत नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर पोकाॅ पांढरे यांनी व्हाॅईस रेकाॅर्डर चालु केले त्यावेळी पोनि श्री.गमे यांनी, दोन्ही पंचांनी व मी निवेदन केले. पोकाॅ पांढरे यांनी व्हाॅईस रेकाॅर्डर बंद केले. त्यानंतर पोनि श्री.गमे यांनी मला व पंच क्र.1 यांना पडताळणी कारवाई दरम्यान करावयाचे कार्यवाहीबाबत सुचना दिल्या. त्यानंतर महाषिकारे यांचेविरूध्द भुमिअभिलेख कार्यालय, षेवगाव येथे लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. पोकाॅ पांढरे यांनी व्हाईस रेकाॅर्डर सुरु करुन तो माझे ताब्यात देवुन मला व पंच नं. 1 यांना महाषिकारे, भूकरमापक यांचीे भेट घेण्यासाठी माझेकडील टीव्हीएस स्टारसिटी कंपनीची दुचाकी मोटार सायकल क्र. एम एच 16- बीआर 2253 वरून 12/07 वा. रवाना केले. तसेच आमचे पाठोपाठ

माझे दाजी यांना त्यांचेकडील मोटार सायकलने रवाना केले. मी व पंच नं. 1 असे भूमिअभिलेख कार्यालय, षेवगाव येथे गेलो. आमचे पाठोपाठ माझे दाजी सदर कार्यालयात आले. मी सदर कार्यालयात महाषिकारे आहेत का याबाबत विचारणा केली. महाषिकारे कार्यालयात नव्हते. त्यानंतर मी माझे मोबाईलवरून महाषिकारे यांना फोन केला असता महाषिकारे यांनी मला ते मोजणीकरीता बाहेर आहेत असे सांगुन थांबुन राहण्यास सांगितले. आम्ही महाषिकारे यांची बराच वेळ वाट पाहिली. त्यानंतर पुन्हा मी माझे मोबाईलवरून महाषिकारे यांना फोन केला असता महाषिकारे यांनी मला नित्यसेवा हाॅस्पिटल, षेवगाव येथे बोलविले. त्याप्रमाणे आम्ही महाषिकारे यांची भेट घेण्याकरीता नित्यसेवा हाॅस्पिटल, षेवगाव समोर गेलो असता महाषिकारे हे सदर हाॅस्पिटलचे समोरील चहाचे हाॅटेलवर थांबलेले होते. तेथे गेल्यानंतर महाषिकारे यांचेत व माझेत आणि माझे दाजी यांचेत माझे आजोबांच्या नावे असलेल्या जमिनीचा सुधारित नकाषा देण्याच्या कामकाजाबाबत चर्चा झाली. त्यावेळी महाषिकारे यांनी सदर काम करून देण्याच्या मोबदल्यात माझेकडे 10,000/-रु. लाचेची मागणी करून तडजोडी अंती 8,000/-रु लाचेची मागणी केली व सदर लाचेची रक्कम पंधरा मिनिटांमध्ये नित्यसेवा हाॅस्पिटल, षेवगावचे समोर घेऊन येणेबाबत सांगितले. त्यानंतर मी,पंच नं. 1 व माझे दाजी खराद असे तेथुन निघुन पोनि श्री.गमे व सापळा पथक थांबले त्या ठिकाणी परत आलो. ती वेळ 13/49 वा. ची होती. तेथे पोकाॅ पाढरे यांनी माझे ताब्यातील व्हाईस रेकाॅर्डर घेवुन तो बंद केला. पोनि श्री. गमे यांनी मला , पंच नं.1 यांना व माझे दाजी खराद यांना महाषिकारे यांची भेट घेण्यासाठी रवाना केले पासुन परत येई पर्यंतची हकीकत विचारली. त्यानंतर पोनि श्री.गमे यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हाईस रेकाॅर्डर मधिल ध्वनीमुद्रीत संभाशण ऐकले. त्यात महाषिकारे यांनी माझेकडे तडजोडी अंती 8,000/-रुपये लाचेची मागणी केली असल्याचे निश्पन्न झाले.

पोनि श्री.गमे यांनी मला लोकसेवक महाषिकारे यांना लाच म्हणुन देण्यात येणारी 8,000/-रुपये लाचेची रक्कम हजर करण्याबाबत कळविले असता मी माझे बचतीतील 8000/-रु. रक्कम हजर केली. षासकिय वाहनात पोनि श्री.गमे यांनी अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट दिव्याच्या वापराबाबत माहिती देवुन त्याचे प्रात्यक्षिक सापळा पथकातील पोकाॅ सुद्रुक यांना करून दाखविण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी प्रात्यक्षिक करून दाखवुन मी हजर केलेल्या नोटांना दोन्ही बाजुंनी अॅन्थ्रासिन पावडर लावली व सदरच्या नोटा माझे पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिषात ठेवुन दिल्या. पोनि श्री. गमे यांनी मला, माझे दाजी खराद यांना, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना लाचेच्या सापळ्या दरम्यान करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना दिल्या. दरम्यान माझे दाजींचे मोबाईलवर महाषिकारे यांचा फोन आला व त्यांनी किती वेळ लागेल असे विचारले असता आम्ही त्यांना दहा मिनिटांत आलो असे सांगितले. सदरचे फोनवरील संभाशण व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये रेकाॅर्ड केले. त्यानंतर महाषिकारे यांचेविरूध्द नित्यसेवा हाॅस्पिटल, षेवगावचे समोर लाचेचा सापळा आयोजित करण्याचे ठरले.

त्यानंतर पोनि श्री.गमे यांचे सुचनेवरून पोकाॅ पाढरे यांनी व्हाॅईस रेकाॅर्डर चालु करून माझे ताब्यात देवुन मला, पंच नं. 1 यांना माझे दुचाकीवरून व माझे दाजी खराद यांना त्यांचेकडील दुचाकीवरून रवाना केले. ती वेळ 14/11 वा. ची होती. आमच्या पाठोपाठ पोनि श्री.गमे, पोनि श्री.गोर्डे व सापळा पथकातील कर्मचारी, पंच नं.2 असे षासकिय वाहनाने आले. आम्ही आंबेडकर चैक, षेवगाव येथे पोहोचल्यानंतर मी माझे मोबाईलवरून महाषिकारे यांना फोन करून कोठे आहेत असे विचारले असता त्यांनी मला नित्यसेवा हाॅस्पिटलसमोरील ताजनापुर रोडवरील कमानीजवळ आहे असे सांगितले. त्याप्रमाणे आम्ही ताजनापुर रोडवरील कमानीजवळ गेलो. पोनि श्री.गमे व सापळा पथक हे आमचे पाठोपाठ षासकिय वाहनाने आले व सदर कमानीजवळ सापळा लावुन थांबले. कमानीचे आत महाषिकारे यांची चारचाकी वॅगनोर गाडी उभी होती. मी व पंच मोटार सायकलवरून उतरून सदर गाडीजवळ गेलो. महाषिकारे हे गाडीत ड्रायव्हरचे बाजुचे षिटवर बसलेले होते. मी त्यांच्या जवळ जावुन महाषिकारे यांना गाडीच्या खाली,या असे म्हणालो असता त्यांनी जायचे आहे लवकर असे सांगितले. त्यानंतर मी त्यांचे समोर त्यांनी मागणी केलेप्रमाणे 8000/-रुपये लाचेची रक्कम धरून मोजुन घेणेबाबत सांगितले असता त्यांनी लाचेची रक्कम त्यांचेकडील काळ्या रंगाच्या प्लॅस्टीकच्या पिषवीत टाकण्यास सांगितली. त्याप्रमाणे मी लाचेची रक्कम त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांचेकडील काळ्या रंगाच्या प्लॅस्टिकच्या पिषवीत टाकली. त्यानंतर मी मला ठरवुन दिलेला लाच स्विकारलेनंतरचा ईषारा केला. त्यावेळी पोनि श्री. गमे व सापळा पथक आमच्या जवळ आले. पोनि श्री. गमे यांनी माझे ताब्यातील व्हाॅईस रेकाॅर्डर घेवुन तो बंद केला. ती वेळ 14/23 वा. ची होती.

त्यानंतर महाषिकारे यांना पकडुन त्यांचेकडील काळ्या रंगाच्या प्लॅस्टिकच्या पिषवीतील लाचेची रक्कम 8000/- रूपये हस्तगत करण्यात आली. पोनि श्री. गमे यांनी महाषिकारे यांना त्यांचे पुर्ण नाव, पद व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव प्रदिप षंकर महाषिकारे, वय 46 वर्शे, धंदा नोकरी, भूकरमापक वर्ग-3, उपअधीक्षक भूमिअभिलेख कार्यालय, षेवगाव, जि.अहमदनगर, रा. स्वामीविवेकानंद काॅलनी, आखेगाव रोड,

षेवगाव, जि.अहमदनगर असे सांगितले.
त्यानंतर महाषिकारे यांना घेवुन पोनि श्री.गमे व सापळा पथक असे षासकिय विश्रामगृह, षेवगाव येथे गेले. मला पोनि श्री.गमे यांनी षासकिय विश्रामगृह, षेवगाव येथे येण्याबाबत सांगितले. षासकिय विश्रामगृह, षेवगाव येथील एका कक्षात महाषिकारे यांच्या ताब्यातुन पंच नं. 2 यांनी घेतलेल्या नोटांच्या आवष्यक त्या तपासण्या करण्यात आल्या. त्यानंतर नोटांचे नंबर तपासुन पाहुन खात्री केली. माझे हाताची व पॅन्टची तपासणी करण्यात आली. पोनि श्री. गमे यांनी षासकिय विश्रामगृह, षेवगाव येथे पंचनाम्याचे पुढील कायदेषीर कामकाज केलेले आहे.
तरी यातील लोकसेवक प्रदिप षंकर महाषिकारे, वय 46 वर्शे, धंदा नोकरी, भूकरमापक वर्ग-3, उपअधीक्षक भूमिअभिलेख कार्यालय, षेवगाव, जि.अहमदनगर, रा. स्वामीविवेकानंद कॉलनी, आखेगाव रोड, षेवगाव, जि. अहमदनगर यांनी माझे आजोबांचे नावे असलेल्या आमरापुर षिवारातील गट नं. 180 मधील 21 गुंठे जमिनिचा सुधारित नकाषा देण्याकरिता आज दि. 14/11/2022 रोजी माझेकडे तडजोडी अंती 8,000/-रुपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम माझेकडुन आज रोजी आयोजीत केलेल्या सापळा कारवाई दरम्यान पंच नं. 1 व माझे दाजी खराद यांचे समक्ष नित्यसेवा हॉस्पिटलसमोरील ताजनापुर रोडवरील कमानीजवळ 14/23 वा. चे सुमारास स्विकारली आहे, म्हणून माझी त्यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

vilas sahadu pulari(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)** पोलीस हवालदार

**Name (नाव):** vilas sahadu pulan
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**